# मेट्रो-३ डेपोच्या यांत्रिकीकरणसाठी निविदाकर्त्यांचा प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ डेपोच्या यांत्रिकीकरण आणि विद्युतीकरण प्रणालींसाठी निविदाकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. यामध्ये डिझाईन, सप्लाय, स्थापना, चाचणी आणि प्रत्यक्ष प्रकल्पाची सुरूवात या कामांचा समावेश आहे. मे.व्होल्टास लि., मे. ब्लूस्टार लि., मे. इटीए आणि मे., पोलीकॅब संयुक्तिक, मे.जॅकसन लि., मे.स्टर्लिंग आणि विल्सन प्रा.लि, मे.सॅम इंडिया बिल्टवेल प्रा.लि. अशा कंपन्यांनी निविदा सादर केल्या आहेत.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ ही मेट्रो-३ मार्गिका संपूर्णतः भुयारी असणार आहे. या मार्गिकेच्या भुयारी मार्गिकेच्या कामाला आता वेग आला असून आत्तापर्यंत आठ टनेल बोरिंग मशिन्सद्वारे ४ हजार २०९ मीटर भुयारीकरण पूर्ण झाले आहे. एमएमआरसीने मार्गिकेच्या बांधकामाचे पाच कंपन्यांना सात टप्प्यात काम देण्यात आले आहे. टनेल बोरिंग मशीन्समार्फत मार्गिकेच्या भुयारी कारणाच्या कामाला आता गती आली आहे. एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या, उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आनंद होत आहे. ट्रेन-डेपोचे कामकाज यांत्रिकीकरण प्रणालीच्या सहाय्याने करण्यात येणार आहेत.